# निशाणी क्र. ५९ वरील आदेश

प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी क्र. १७ कथन करतात की, प्रतिवादी क्र. १७ हे दिनांक १४/०२/२०२३ रोजी दाव्यात हजर झाले आहेत. प्रतिवादीला जुनी कागदपत्रे व जुने सातबारा उतारे उपलब्ध न झाल्याने न्यायालयात हजर राहून मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करणे शक्य झाले नाही. प्रतिवादी यांची दाव्यासंदर्भातील कैफियत व तुर्तातुर्त मनाई अर्जावरील म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे अशी न्यायालयास नम्र विनंती करण्यात येत आहे. प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ प्रतिवादी यांनी नि.क्र.६० वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे.

२. सदर अर्जावर लेखी म्हणणे देत वादी कथन करतात की, प्रतिवादीचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. कारण संयुक्तिक नाही. प्रतिवादी क्र. ३ हे प्रतिवादी क्र. १७ चे पती असल्याने त्यांना दाव्याची संपूर्ण माहिती होती. परंतु प्रतिवादीने मुद्दामहून कैफियत व म्हणणे दाखल करण्याचा अर्ज उशीरा दाखल केला आहे. सबब प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा आणि मंजुर करणेचा झाल्यास वादीस हेवी कॉस्ट मिळावी अशी न्यायालयास विनंती करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांनी दाखल केलेला अर्ज आणि त्यावरील वादी यांचे तर्फे म्हणणे विचारात घेतले. दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुत दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेबाबत दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना समन्स लागू झाल्यानंतर तीस दिवसांमध्ये दाव्यास कैफियत देणे बंधनकारक होते. परंतु प्रतिवादी यांना वारंवार संधी देवून देखील त्यांनी मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल केलेली नाही. परंतु दाव्याचे स्वरुप पाहता दावा हा गुणदोषांवर निकाली होणेकरीता दोन्ही पक्षांचे म्हणणे विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करता प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणारे आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

रे.मु.नं. ३५८/२०१७
अनिता वि. शारदाबाई आणि ईतर

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १७ विरुध्द पारीत करण्यात आलेला विनाकैफियत आदेश ५००/– रुपये इतक्या कॉस्टसहीत रद्द करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी यांनी वर नमूद कॉस्ट वादी यांना द्यावी असे प्रतिवादींना आदेशित करण्यात येत आहे.

४. सदर कॉस्ट वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात येईल.

सही/-

**(श्रीमती गायत्री एस. पाटील)**

दिनांक: २८/११/२०२४

३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बार्शी. जि. सोलापूर.

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same word to word as per original Judgment/order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | **S.V. Kokate (Grade III)** |
| Name of the court | : | **Smt. Gayatri S. Patil** |
| | | **3rd Jt. CJJD & JMFC,** |
| | | Barshi, Dist. Solapur. |
| Judgment/order declared on | : | **28/11/2024** |
| Judgment/order signed by Presiding officer | : | **28/11/2024** |
| Judgment/order uploaded on | : | **29/11/2024** |